!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४७६ ०९-३-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# कामगार राज्यविमा महामंडळाच्या कर्मचारी महासंघ नवी दिल्लीच्या अध्यक्षपदी खासदार चंद्रकांत खैरे यांची बिनविरोध निवड

**संभाजीनगर (ता. १२) : कामगार** राज्यविमा महामंडळाच्या कर्मचारी महासंघ नवी दिल्लीच्या अध्यक्षपदी खासदार चंद्रकांत खैरे यांची बिनविरोध निवड आंधप्रदेशातील हैदराबाद येथे पार पडले ईएसआयसी कर्मचारी महासंघाच्या २५ व्या राष्ट्रीय अधिवेशनात शुक्रवारी करण्यात आली. या बद्दल आज ईएसआयसी उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मिरा घटवई व शिवसेना संभाजीनगरच्यावतीने शहरप्रमुख राजु वैद्य, संतोष जेजुरकर, बाळासाहेब थोरात यांनी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांचा सत्कार केला.

सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, नरेंद्र त्रिवेदी, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, आमदार संदिपान भुमरे, महापौर त्र्यंबक तुपे, माजी महापौर कला ओझा, सुनिता आऊलवार, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, संतोष माने, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, राजु राठोड, रघुनाथ चव्हाण, लक्ष्मण राजपुत, शहरप्रमुख राजु वैद्य, संतोष जेजुरकर, बाळासाहेब थोरात, तालुकाप्रमुख दिलीप मचे, बप्पा दळवी, सुदर्शन अग्रवाल, प्रा. रमेश बोरनारे, किशोर कुकलारे, डॉ. अण्णा शिंदे, अशोक शिंदे, प्रकाश दुबे यांची उपस्थिती होती.

२०१५-२०१६ सालीसाठी ही निवड करण्यात आली असुन उपाध्यक्षपदी व्ही. एस. ताटे- मुंबई, राजेंद्र यादव-इंदोर, पी. के. डे. कलकत्ता, सेक्रेटरी जनरल रामाकृष्णन दिल्ली, शिवाजीराव शेटे खजिनदार मुंबई यांची निवड झाली आहे. ५०००० हुन अधिक कर्मचारी या महामंडळाच्या सेवेत आहेत. हे महामंडळ सामाजिक सुरक्षा कामगार वर्गाला पुरविण्याचे काम करते.

त्याशिवाय खासदार चंद्रकांत खैरे हे ऑल इंडिया ईएसआयसी मेडीकल ॲण्ड कॉलेजेस् च्या कर्मचारी फेडरेशनच्या अध्यक्षपदी गेल्या महिण्यात बिनविरोध निवडुन आले आहे. देशभरातील चारशे हॉस्पिटल मधील ४००० कर्मचारी काम करतात. त्या कर्मचाऱ्यांसाठी हे फेडरेशन काम करते. खासदार चंद्रकांत खैरे हे ईएसआयसी कार्पोरेशनचे बोर्ड मेंबर असुन त्यांच्या स्टँडींग कमिटीचे लोकसभा नियुक्त सदस्य आहेत.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525